# प्रकरण पाचवे

## निष्कर्ष: समस्या व उपाययोजना

## प्रकरण पाचवे

## निष्कर्ष: समस्या व उपाययोजना

या प्रबंधामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढीच्या कार्याचा व सभासदांना झालेल्या लाभाचा अभ्यास केला आहे. तथ्य संकलनासाठी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या वार्षिक अहवालांचा वापर करण्यात आला आहे. तसेच काही माहिती पतपेढी संस्थेचे सेक्रेटरी, लेखानिक यांच्याशी चर्चा करुन उपलब्ध झाली आहे.

अभ्यासाचा विषय पतपेढीचा एकूण विकास व व्यवहारांशी संबंधीत असल्याने पतपुरवठा संस्थांचा विकास व पतपेढी संस्थांची गरज थोडक्यात स्पष्ट केली आहे. व त्यानंतर संस्थेच्या प्रगतीचे विवेचन केले आहे.

या अभ्यासात शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढीची स्थापना, कोल्हापूर शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शिवाजी विद्यापीठाचा इतिहास, तसेच संस्थेची सभासद संख्या, भांडवलाचे स्वरुप, ठेवीचे स्वरुप, संस्थेने केलेला कर्जपुरवठा व नफा इ. व्यवहारांचा अभ्यास करुन त्याप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

या स्पष्टीकरणावरुन, मिळालेल्या आकडेवारीवरुन व माहितीवरुन शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या स्थितीबद्दल पुढील निष्कर्ष निघतात.

१) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढीस स्थान झाल्यापासून आजपर्यंत, या वीस वर्षाच्या कालावधीत तपासणी वर्ग "अ" मिळाला असून ही बाब संस्थेच्या विकासाची व प्रगतीची मार्गदर्शक ठरते.

२) या पतपेढीची सभासद संख्या सुरुवातीस वेगाने वाढली परंतु नंतर तिचा वाढीचा वेग कमी झाली आहे. कारण सभासद संख्या शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संख्येवर अवलंबून आहे. पतपेढीची सभासद संख्या २९४.४७ टक्क्यानी वाढली असून वार्षिक सरासरी वाढ ७.६६ टक्के आहे.

३) पतपेढी संस्थेच्या भांडवल उभारणीच्या साधनांपैकी भाग भांडवल हे प्रमुख साधन आहे. पतपेढीने सभासद करून घेताना कमीत कमी एक भाग धारण करण्याची अट घातल्याने सभासद संख्या वाढीबरोबर भागभांडवल वाढत आहे. या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये भाग भांडवल प्रचंड पटीने वाढले आहे. मात्र सरासरी वार्षिक भांडवल वाढ ४१.६१ टक्के असल्याचे दिसून येते. भाग भांडवलातील वाढीमुळे संस्था सभासदांची कर्जाची मागणी पूर्ण करु शकते. १९७३-७४ साली भांडवल वाढ ११५.०६ टक्के होती. परिणामी कर्ज पुरवठा ११९.३२ टक्क्यानी वाढल्याचे दिसून येते.

४) संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. संस्थेचे वाढते भागभांडवल व वाढता कर्जपुरवठा यामुळे खेळत्या भांडवलात वृध्दी घडून येते आहे. खेळत्या भांडवलातील वार्षिक सरासरी वाढ ४२.७२ टक्के झाली आहे. संस्थेने आपले भांडवल वाढविण्यासाठी वाढती कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून सन १९८१-८२ साली ८,४०,०००.०० रुपये कर्ज घेतले आहे.

संस्थेने आपले भांडवल वाढविण्यासाठी भाग भांडवल मर्यादा वेळोवेळी वाढविली आहे. सध्याही मर्यादा रु. ५०,००,०००.०० एवढी आहे.

५) पतपेढी संस्थांचे भांडवल वाढविण्याच्यादृष्टीने ठेवींना फार महत्त्व आहे. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी सुध्दा

कायम ठेवी, मुदतबंद ठेवी व मासिक ठेवी स्वीकारते. या संस्थेने ठेवीमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. संस्था मासिक ठेवी व्याजासहीत वर्ष अखेरीस परत करीत असल्याने मासिक ठेवींचे प्रमाण वाढले आहे. तसेच संस्थेस किती ठेवी गोळा होणार व त्यांची कालमर्यादा माहित असल्याने संस्था मोठया प्रमाणावर कर्ज पुरवठा करु शकते. संस्था सर्व ठेवींवर १२ टक्के व्याजदर देते हा व्याज दर इतर वित्तीय संस्थांपेक्षा जास्त आहे. १९८८-८९ पर्यंत मासिक ठेवी २८११.३७ टक्क्यानी वाढल्याने, यातून संस्थेचे यश निदर्शनास येते.

तसेच संस्थेने भांडवल वाढविण्यासाठी मुदतबंद ठेव व कायम ठेव स्विकारण्यास सुरुवात केल्याने संस्थेचे भांडवल मोठया प्रमाणात वाढले आहे. संस्थेने कर्ज देताना मंजूर कर्जाच्या १० टक्के रक्कम "बिनपरतीची ठेव" (कायम ठेव) म्हणून जमा केल्याने कायम ठेव १९८६-८७ साली ३७८.७५ टक्क्यानी वाढली आहे. त्याचवर्षी मुदत बंद ठेवीतील वाढ अधिकतम (२४०.८६ टक्के) आहे.

६) पतसंस्थांच्या उद्दिष्टामधील सभासदांना अल्प दराने कर्ज पुरवठा करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. आधुनिक युगात सर्व स्तरावर कर्जाची नितांत गरज भासत आहे. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेने सभासदांना जास्तीत जास्त कर्ज पुरवठा करण्यासाठी विधीमध्ये व उपविधी-मध्ये वेळोवेळी बदल केले व कर्जाची मर्यादा २०,००० रुपयापर्यंत वाढविली आहे.

१९८१-८२ मध्ये कर्ज मर्यादा वाढविल्यामुळे कर्ज पुरवठा रक्कमेत महत्तम वाढ झाली (१३७.६ टक्के) कारण मुदती व मासिक ठेवीतील वाढते प्रमाण होय. या उलट १९८६-८७ साली कर्ज पुरवठयात, १९८५-८६ शी तुलना करता ९.८८ टक्क्यानी घट झाली आहे.

संस्था कर्ज वसूली समान मासिक हप्त्यांमध्ये करते. कर्ज शिवाजी विद्यापीठाकडून परस्पर सभासदांच्या वेतनातून वसूल होत असल्याने पतपेढीस थकबाकीचा प्रश्न उद्भवत नाही. ही बाब संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

७) सभासदांना घरगुती उपयुक्ततेची अगर अत्यावश्यक वस्तू एकाच वेळी खर्च करुन खरेदी करता यावी म्हणून हायर पर्चेस कर्ज योजना १९८६-८७ मध्ये सुरु केली परंतु काही कागदपत्राबाबत व तांत्रिक अडचणी उद्भवल्याने पुढच्याच वर्षी ही योजना बंद केली. १९८६-८७ या योजनेचा लाभ ४५९ सभासदांनी घेतला. हे प्रमाण एकूण सभासद संख्येशी ६१.६९ टक्के आहे. यावरुन ही योजना सभासदांच्या फायद्यासाठी पुन्हा सुरु केल्यास अनेक सभासद लाभ घेऊ शकतील.

८) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी कर्जाची मागणी, जमा होणाऱ्या ठेवी व एकूण व्यवहारांचा विचार करुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गुंतवणूक करीत आहे. संस्थेचे गुंतवणूक १९८१-८२ साली ३३२.०६ टक्क्यानी वाढली आहे. कारण याच वर्षापासून बँकेकडून कर्ज घेण्यास सुरुवात केली आहे. पतपेढी बँकेमध्ये बँक शेअर्स, रिझर्व फंड ठेव व मुदतबंद ठेव या स्वरुपात गुंतवणूक करते.

९) एकूण उलाढालीवरुन संस्थेने केलेल्या व्यवहारांची कल्पना येते. तक्ता नं. ४:३ वरुन असे स्पष्ट होते की संस्थेची १९८८-८९ पर्यंत एकूण उलाढाल दोन कोटी रुपयापर्यंत वाढली आहे. ही वाढ संस्थेच्या प्रगतीची निदर्शक आहे. १९७०-७१ ते १९८८-८९ या कालावधीत सर्वाधिक वार्षिक वाढ १९८०-८१ साली झाली आहे. ही वाढ ९० टक्क्यानी अधिक आहे. कारण या वर्षी मासिक ठेवीतील वाढ जास्त आहे तर संस्थेने बँकेकडून

कर्ज घेतल्याने कर्जपुरवठा १३७.६० टक्क्यानी वाढला आहे. या उलट १९८७-८८ साली सभासद संख्या ०.६७ ने घटल्याने व भाग भांडवल फक्त १०.८९ टक्क्यानी वाढल्यामुळे एकूण उलाढाल वाढ सर्वात कमी म्हणजे ५.७८ टक्के झाली आहे. एकंदरीत संस्थेच्या एकूण व्यवहारात वाढ होत असून संस्था भक्कम पायावर उभी आहे.

१०) संस्थेच्या एकूण व्यवहारांची संख्या जसजशी वाढते आहे तसतशी उत्पन्न व खर्चात वाढ दिसून येते. संस्थेच्या उत्पन्नामध्ये सर्वात मोठा वाटा सभासद कर्जापासून मिळणाऱ्या व्याजाचा आहे. तर खर्चामध्ये बँक कर्ज व्याजाचा मोठा वाटा आहे. १९७१-७२ ते १९८८-८९ या अठरा वर्षामध्ये उत्पन्नातील सरासरी वार्षिक वाढ ४८.१२ टक्के तर खर्चातील सरासरी वार्षिक वाढ ७९.२० टक्के आहे. यावरून असे दिसून येते की उत्पन्नातील वाढीपेक्षा खर्चातील वाढ अधिक आहे.

११) तुलनात्मकदृष्टया अन्य वित्तीय संस्थांपेक्षा कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा हेतू व्यापक आहे. म्हणजेच नफ्यावर लक्ष केंद्रीत न करता सभासदांना पुरविल्या जाणाऱ्या सेवासुविधा व कल्याणकारी सेवांवर लक्ष पुरविले जाते. कोष्टक क्र. ४:५ मध्ये एकूण नफ्यामध्ये गतवर्षीचा शिल्लक नफा, चालू वर्षाचा नफा यांचा समावेश आहे. १९७०-७१ साली एकूण नफा ७४१.९५ रुपये होता. यामध्ये १९८८-८९ पर्यंत रु. ५,९७,३४४.०९ एवढा वाढला आहे. या कालावधीत नफ्यात प्रचंड वाढ झाली. तर सरासरी वार्षिक वाढ ४३.९९ टक्के आहे. यावरून असे दिसते की पतपेढीस दरवर्षी नफा झाला असून त्यामध्ये वाढ होत आहे.

१२) पतसंस्थेस होणारा एकूण नफा विविध घटकांमध्ये विभागला जातो. शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी एकूण नफ्याच्या २५ टक्के रक्कम

राखीव निधीमध्ये जमा करते. १९७६-७७ मध्ये रु. ३,२४७.७७ असलेला राखीव निधी १९८८-८९ मध्ये रु. १,४९,२०३.२० पर्यंत वाढला आहे. म्हणजेच या निधीत भर पडत आहे.

पतसंस्था सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहारांच्या संख्येच्या १९८३-८४ पर्यंत ९ टक्के दराने बोनस वाटप करीत होती. परंतु १९८३-८४ नंतर कायद्यातील बदलानुसार हे प्रमाण १२ टक्के पर्यंत वाढवले. या लाभांशामुळे सभासदांचा फायदा होतो व त्यामुळे सभासद संस्थेशी व्यवहार वाढविण्याचा प्रयत्न करतात.

पतसंस्थेने एखादयावेळी नफा कमी झाल्यास सभासदांना १२ टक्के लाभांश वाटता यावा म्हणून लाभांश समीकरणो निधीची तरतूद केली आहे.

सभासदांच्या कल्याणासाठी व विकासासाठी निधीची तरतूद केली आहे. सभासदांच्या कुटुंबियांनी मुले, मुली, तसेच स्वत: सभासदाने शिक्षण व क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविल्यास त्यांना बक्षिस रुपाने प्रोत्साहन दिले जाते. तसेच सभासदाचा अचानक मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना रुपये १०००.०० मदत दिली जाते.

त्याचप्रमाणे पतसंस्थेने धर्मादाय निधी, इमारत निधी, रौप्य महोत्सवी निधी नफ्यातून शिल्लक टाकले आहेत. संस्था एकूण नफ्याच्या ६० ते ७० टक्के नफा सभासदांना लाभांश स्वरुपात वाटला जातो.

वरील विवेचनावरुन असे म्हणता येईल की संस्था स्वत:च्या भक्कम पायावर उभी असून संस्थेच्या ठेवी, भांडवल, कर्ज वितरण, व नफा यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

५:१ पतसंस्थेच्या समस्या:

पहिल्या चार प्रकरणांमध्ये संस्थेची प्रगती कशी झाली याचे विवेचन केले आहे. या प्रकरणामध्ये संस्थेच्या समस्यांचा अभ्यास करणार आहोत. इतर संस्थाप्रमाणे पगारदार नोकरांच्या पतसंस्थांना भांडवल, व्यवस्थापन किंवा कर्जवसुली बाबत गंभीर स्वरुपाच्या प्रश्नांना तोंड दयावे लागत नाही. तरी सुध्दा त्यांच्या काही समस्या समजावून घेणे व त्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

१) पगारदार नोकरांची पतसंस्था ही एकाच संस्थेच्या नियंत्रणाखाली असलेल्या व्यक्तींची संस्था असते. संस्थेचे सभासदत्त्व खुले असल्याने जे कर्मचारी संस्थेचे सभासद आहेत त्यांचीच कर्जविषयक गरज पूर्ण होते. परंतु जे सभासद नाहीत त्यांना कर्ज पुरवठा होत नाही. त्यामुळे त्यांना इतर संस्थाकडे (विशेषत: सावकाराकडे) कर्ज मागणी करावी लागते, शिवाय अन्य संस्थाकडून आवश्यक तेवढे कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे संस्थेचे सभासद व बिगर सभासद यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये दरी निर्माण होते.

२) उच्च स्तरावरील संघ संस्थेचा अभाव असल्याने पगारदार नोकरांची जिल्हा पातळीवर किंवा राज्य पातळीवर संघटना नाही. त्यामुळे संस्थांना एकमेकांच्या अडचणी समजू शकत नाहीत.

३) पतसंस्था सभासदांना ज्या कारणासाठी कर्ज देते त्याच कारणा-साठी कर्ज रक्कम वापरली जाते किंवा नाही याची पाहणी केली जात नाही. त्यामुळे सभासद गरज नसताना चैनीसाठी, किरकोळ कारणांसाठी कर्ज घेतात व त्याचा योग्य विनियोग न झाल्यामुळे सभासद कायम कर्जबाजारी राहतो. त्याचा परिणाम सभासदांच्या कुटुंबियावर होतो. कारण कर्ज हप्ता वेतनातून जमा होत असल्याने सभासदाचे वेतन घटते व त्यामुळे सभासदांच्या कुटुंबियांवर आर्थिक पेच प्रसंग उद्भवतात.

४) पतपेढी संस्थांच्या ठेवींना सरकारचे पाठबळ नसते. त्यांना ठेवी विमा योजना लागू नसते. परंतु बँकेतील ठेवींना सरकारचे पाठबळ असल्याने बँका बुडू शकत नाहीत. मात्र पतसंस्था बुडण्याची शक्यता असल्याने सभासद आपल्या ठेवी बँकेत ठेवणे पसंत करतात. परिणामी पतसंस्थांचे भांडवल वाढू शकत नाही.

५) पगारदार नोकरांच्या पतसंस्थांचे सभासद सुशिक्षित असूनसुध्दा त्यांना ताळेबंद पत्रकाचे आकलन असत नाही. तसेच संस्थेचे सर्व व्यवहार सभासदांना तपासण्यासाठी खुले असताना सुध्दा त्याची कोणीही दखल घेत नाही.

६) सभासद, नागरी बँका व पतपेढी संस्था दोन्हीकडून कर्ज घेतात. तेव्हा बँका व पतपेढी संस्थानी सभासदांना कर्ज देतेवेळी याची योग्य दखल घ्यावी म्हणजे सभासद कर्जबाजारी राहणार नाही.

७) पतसंस्थेस नागरी बँका व व्यापारी बँका यांच्या बरोबर स्पर्धा करावी लागते. या स्पर्धेत पतसंस्था टिकू शकत नाहीत.

५:३ सुचविण्यात आलेल्या उपाय योजना:

१) सभासद ज्या कारणासाठी कर्ज घेतात त्याच कारणासाठी वापरतात किंवा नाही याची पाहणी करणेत यावी व त्यासाठी वेगळी यंत्रणा उभी करावी.

२) पतसंस्थांच्या ठेवींना ठेवी विमा योजना लागू करण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावेत म्हणजे त्यांच्या भांडवलात वाढ होण्यास मदत होईल.

३) संस्थेच्या "ब" वर्ग सभासदांची संख्या अत्यल्प आहे. ती वाढविण्यासाठी प्रयत्न करावा. तसेच संस्था "ब" वर्ग सभासदांकडून फक्त मुदती ठेवी स्वीकारते. परंतु त्यांना कर्ज पुरवठा करीत नाही. संस्थेने या "ब" वर्ग सभासदांना त्यांच्या मुदती ठेवींच्या तारणावर ठराविक प्रमाणात कर्ज पुरवठा करावा.

४) पतसंस्थांनी सोन्याच्या तारणावर कर्ज पुरवठा करावा.

५) संस्थेने सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा योग्य व अल्प दरात पुरवठा करण्याचा प्रयत्न करावा व सभासदांना जीवनावश्यक वस्तू खरेदी करता याव्यात म्हणून हायर पर्चेस कर्ज पुरवठयातील त्रुटी कमी करुन सभासदांना या योजनेमार्फत कर्ज पुरवठा करावा.

६) संस्थेने सभासद, कर्मचारी यांना संस्थेच्या कामकाजाविषयी व प्रगत व्यवस्थापना विषयी शिक्षण, प्रशिक्षण व मार्गदर्शन द्यावे.

७) संस्थेने सभासदांना वैद्यकिय मदत अल्प मोबदल्यात उपलब्ध करुन द्यावी.

८) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी बँकेकडून कर्ज घेण्यापूर्वी सभासदांना १२ टक्के दराने कर्जपुरवठा करीत होती परंतु बँकेकडून १३.५ टक्के दराने कर्ज घेतल्याने संस्थेने आपला व्याजाचा दर १५ टक्के पर्यंत वाढविला. पतसंस्थेने बँकेकडून कर्ज घेण्यापेक्षा अंतर्गत भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे सभासदांना जादा व्याज दराचा भुर्दंड बसणार नाही व त्यांना अल्प दराने कर्ज उपलब्ध होईल.

९) संस्थेने भांडवल वाढविण्यासाठी सभासदांना सक्तीची बचत करण्यास भाग पाडावे. तसेच संस्थेने बचत ठेव स्विकारण्यास सुरुवात करावी म्हणजे ठेवी वाढण्यास मदत होईल.

१०) संस्थेच्या उत्पन्नातील वाढीपेक्षा खर्चाच्या वाढीचे प्रमाणे जास्त आहे. त्यावर नियंत्रण ठेवून संस्थेने आपला खर्च कमी करण्याचा प्रयत्न करावा.

११) संस्थेने सभासदांना किमान सत्रातून एकदा तरी एकत्रित करुन ठेवींमध्ये वाढ करण्याचे आवाहन करावे व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करावे.

......

## -: संदर्भ - ग्रंथ :-

(१) डॉ. गो. स. कामत - सहकार : तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन, श्री विद्या प्रकाशन, पुणे - ३०.

(२) प्रा. ए. आर. रायखेलकर व प्रा. अशोक डांगे - सहकार : तत्त्वे आणि सहकार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

(३) प्रा. जी. एन्. अलवंडी - सहकार (तत्त्व व व्यवहार) - "राजेंद्र प्रकाशन", सोलापूर.

(४) प्रा. व्ही. टी. चौगुले व प्रा. के. जी. पठाण - भारतीय सहकारी चळवळ, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे - ३०.

(५) डॉ. व्ही. बी. घुगे, - छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण, दी कोल्हापूर रायटर्स को-ऑप. सोसायटी लि., शाहूपुरी, कोल्हापूर.

(६) Dr. B. S. Mathur - Co-operation in India, Sahitya Bhavan, Agra.

## -: नियत - कालीके :-

(१) सहकारी विश्व - कोल्हापूर जिल्हा छापखाना, नागाळा पार्क, कोल्हापूर.

(२) सहकारी महाराष्ट्र - महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे.

-: अहवाल :-

(१) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे १९७०-७१ ते १९८८-८९ पर्यन्तचे वार्षिक अहवाल.

(२) शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था मर्यादीत, कोल्हापूर - नियमावली.

-: संशोधन प्रबंध :-

(१) श्री. निंबाळकर पी. वाय. - नागरी सहकारी बॅन्कांची कार्यपध्दती - विशेष संदर्भ श्री बलभीम को-आॅप. बॅन्क लि., कोल्हापूर. शिवाजी विद्यापीठ एम्. फील्. पदवी परीक्षेसाठी ( अंशतः ) सादर.

(2) Shri. Patil S. S. - Warana Co-operative Bank - A case study in co-operative banking and rural development - M.Phil. - 1985.